ePaper

# दिलेला शब्द पाळा, अन्यथा..; राजू शेट्टींचा राज्य सरकारला इशारा



वर्ष - 6 । अंक - 348 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- नितिन गडकरींची एक घोषणा अन् चांदणी चौकातील उड्डाणपुलाचं काम 90 टक्के पूर्ण
- लोकसभा-विधानसभेसाठी भाजपचा निर्धार!
- मुस्लिमांचं कोणतंही आरक्षण संपणार नाही


www.mahaenews.com | शुक्रवार दि. 7 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मालमत्ता करात घसघशीत सवलत!

## आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह: महापालिकेच्या मालमत्ता कराच्या सवलती जाहीर

### मालमत्ता कर: विविध योजनांचा 30 जूनपर्यंत लाभ घ्या, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे आवाहन



।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत महिलांच्या नावाने असलेल्या निवासी मिळकतींवर सामान्य करात 30 टक्के, दिव्यांगाना 50 टक्के सवलत देण्यात येणार आहे. तर माजी सैनिकांना 100 टक्के सवलत लागू आहे. यासाठी गतवर्षी लाभ घेतलेल्या महिला, दिव्यांग आणि माजी सैनिकांना नव्याने अर्ज करण्याची गरज नाही. तसेच नागरिकांनी महापालिकेच्या विविध मालमत्ता कर सवलतीच्या विविध योजनांचा 30 जूनपर्यंत लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

शहरात 5 लाख 97 हजार 785 मालमत्ता आहेत. गतवर्षी कर संकलन विभागाने महापालिकेच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात प्रथमच 817 कोटी रुपयांचा महसूल गोळा केला आहे. यासाठी विविध योजना, जप्ती मोहीम, मोठ्या प्रमाणात जनजागृती, बड्या थकबाकीदारांची वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे यासह आदी उपक्रम हाती घेतले होते.

त्यामुळे मोठ्या प्रमाणात कर वसुली करण्यात विभागाला यश आले आहे.

याच अनुषंगाने 2023-24 या आर्थिक वर्षात 1 हजार कोटींचा टप्पा गाठण्यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी आत्तापासूनच कंबर कसली आहे. महापालिकेच्या वतीने करदात्या नागरिकांना कराचा भरणा करता यावा, यासह सर्व सेवा सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याच अनुषंगाने 2023-24 या आर्थिक वर्षात 30 जूनपर्यंत कराचा भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

### पर्यावरण पूरक सवलतीसाठी गृहनिर्माण सोसायट्यांनी अर्ज करावेत

» शहरातील पर्यावरण पूरक हौसिंग सोसायट्यांनी सवलतीचा लाभ घेण्यासाठी लवकरात-लवकर अर्ज करावेत. जेणेकरून अशा सोसायट्यांना आगाऊ कर भरण्याचा आणि पर्यावरण पूरक सवलतीचा एकत्र लाभ घेता येईल.

> 30 जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा केल्यास किमान दहा टक्के व कमाल 20 टक्के सलवत मिळते त्याचा नागरिकांनी फायदा घेतला पाहिजे. त्यानंतर लागणारे महिना दोन टक्के विलंब शुल्क टाळण्यासाठी 30 जूनपूर्वी नागरिकांनी आगाऊ कराचा भरणा करावा. मालमत्ता सवलत योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग, महिला, माजी सैनिकांना नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मालमत्ता कर सवलतीच्या योजनांचा लाभ नागरीकांनी घ्यावा.
>
> – शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# अरेरे चिंताजनक: पिंपरी-चिंचवडमध्ये कोरोनाची रुग्णसंख्या पुन्हा १८१ वर

## एका कोरोना रुग्णाचा मृत्यू झाल्याने महापालिका 'अ‍ॅक्शन मोड'वर...

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

'कोरोना'ने पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा उचल खाल्याने शून्यावर आलेली रुग्णसंख्या पुन्हा १८१ झाली आहे. त्यात आज एका कोरोना रुग्णाचा मृत्यू झाल्याने महापालिका प्रशासन पुन्हा सतर्क झाले आहे. गेल्या महिन्यात १६ तारखेला 'स्वाईन फ्लू'च्या H3N2 या नव्या विषाणूने उद्योगनगरीत मृत्यू झाला होता. त्यानंतर वीस दिवसांतच कोरोनाच्या ओमीक्रॉन या नव्या व्हेरीएंटने आज बळी गेल्याने पालिका प्रशासन अ‍ॅक्शन मोडवर आले आहे. मात्र, नवा कोरोना व्हेरीएंट तथा विषाणू हा घातक नसल्याने ही बाब काहीसी दिलासा देणारी ठरली आहे.



नव्या कोरोना साथीची लक्षणे सौम्य असल्याने रुग्णालयात दाखल होणाऱ्या या रुग्णांची संख्या हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. १८१ पैकी फक्त हे पाच पेशंट हॉस्पिटमध्ये दाखल असून बाकीचे घरीच (होम आयसोलेशन) उपचार घेत आहेत.

### वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा

» काल शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान ८९ वर्षीय वृद्धाचा कोरोनाने मृत्यू झाला. श्वसन आजाराकरिता ३१ जानेवारीला त्यांना सदर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सर्दी, खोकला, घसादुखी, ताप ही लक्षणे असल्यास लगेचच नजीकच्या पालिकेच्या दवाखाना/रुग्णालयामधील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पालिकेचे वैद्यकिय विभागप्रमुख तथा सहाय्यक आरोग्य, वैद्यकिय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे यांनी केले आहे.

# चांदणी चौकातील उड्डाणपुलाचं काम 90 टक्के पूर्ण!

## 1 मे रोजी होणार उद्घाटन


। मंचर । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्यातील बहूप्रतिक्षित चांदणी चौ: पुण्यातील बहुप्रतिक्षित चांदणी चौकातील (CHANDANI CHOWK) प्रकल्पाच्या कामाला चांगलाच वेग आला आहे. या प्रकल्पाचं 90 टक्के काम पूर्ण झालं आहे. या पुलाची पाहणी करुन 1 मे म्हणजेच महाराष्ट्र दिनी उद्घाटन होणार असल्याची घोषणा मंत्री नितिन गडकरी (NITIN GADKARI) यांनी केली होती. त्यानंतर चांदणी चौकातील प्रकल्पाच्या कामाला वेग आला होता. पुणेकर मागील अनेक महिन्यांपासून हा उड्डाणपूलाच्या लोकार्पणाची वाट बघत होते. अखेर 1 मे रोजी या उड्डाणपूलाचं उद्घाटन होणार आहे.**

उद्घाटनाच्या तारखेची घोषणा झाल्यानंतर काम वेगाने करा, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिले होते. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या कामाला वेग आला होता. काही दिवसांपूर्वी त्यांनी या संपूर्ण कामाची पाहणीदेखील केली होती. या उड्डाणपुलाचं गर्डर टाकण्याचं काम 15 ते 20 एप्रिल दरम्यान करण्याचं नियोजन केलं आहे. हे काम सुरु होण्यापूर्वी या मर्गावरील वाहतूक वळवण्यात येणार आहे. त्यासोबतच मुळशीच्या दिशेने जाणाऱ्या भुयारी मार्गाचं कामदेखील सुसाट सुरु आहे.

**वाहतुकीत बदल...**

एनडीए चौक परिसरातील नवा उड्डाणपूल आणि तेथील रस्त्यांचा 'एनएचएआय'कडून आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार या चौकातील उड्डाणपूल आणि रस्त्यांची 90 टक्के कामं पूर्ण झाली आहेत. नव्या उड्डाणपुलासाठी आवश्यक खांब उभारणीचे काम पूर्ण झालं आहे. 15 ते 20 एप्रिलदरम्यान गर्डर टाकण्याचे काम होणार आहे. त्यासाठी वाहतूक दोन दिवस पर्यायी मार्गाने वळविण्याचे नियोजन 'एनएचएआय'कडून करण्यात येत आहे. बावधन ते सातारा आणि वेदभवन ते मुळशी या सेवा रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून 10 एप्रिलपासून हे रस्ते वाहनचालकांसाठी खुले करण्यात येणार असल्याचे 'एनएचएआय'कडून सांगण्यात आले.



**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता**

» 1 मे रोजी या पुलाचं लोकार्पण होणार असल्याची घोषणा मंत्री नितिन गडकरी यांनी केली होती. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ घेऊ आणि त्यानुसार उद्घाटन करु असं नितिन गडकरी म्हणाले होते. त्यामुळे या उड्डाणपुलाच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता शक्यता आहे.

**चांदणी चौकातील वाहतूक कोंडी सुटणार**

मागील काही महिन्यांपासून चांदणी चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होती. या उड्डाणपुलाचं काम सुरु असल्याने वाहतुकीसाठी मोठी समस्या निर्माण होत होती. चांदणी चौकातील हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर वाहतूक कोंडी फुटणार असं सांगण्यात आलं आहे. त्यामुळे या पूलाचं लोकार्पण झाल्यानंतर खरंच वाहतुकीत काही फरक जाणवेल का? हे पाहणं महत्वाचं असणार आहे.

# मोठा अनर्थ टळला!

## जुन्नरच्या यात्रेतील बगाड मधोमध तुटलं

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आठ-दहा फुटांवरुन मानकरी खाली कोसळले अन्...**

पुण्याच्या जुन्नर तालुक्यातील यात्रेत पारुंडे येथील ब्रम्हनाथ यात्रेचं आकर्षण असणारं बगाड मधोमध तुटलं. मात्र या घटनेत कोणालाही ईजा झाली नाही त्यामुळे मोठा अनर्थ टळला. एका बाजूचे मानकरी आठ-दहा फुटांवरून खाली कोसळले. सुदैवाने यात कोणतीही हानी झाली नाही. हा प्रकार मोबाईल कॅमेऱ्यात ही कैद झाला.

काल सायंकाळी ही घटना घडली. यात्रेचा उत्साह शिगेला पोहचला होता. बगाड ग्रामपंचायतीसमोर आलं होतं. बगाडच्या दोन्ही बाजूला मानकरी होते. आठ ते दहा फूट हवेत मानकरी असताना, बगाड प्रदक्षिणा घेत होतं. तेव्हाच बगाड मधोमध तुटलं आणि सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला. एका बाजूचे मानकरी आठ ते दहा फुटांवरून खाली कोसळल्याने खळबळ उडाली होती. सुदैवाने यात कोणतीही हानी झाली नाही.



# राज्यभरातील 800 शाळा बोगस!

## 100 बोगस शाळांना टाळं तर 700 शाळा रडारवर

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील 800 शाळा बोगस (SCHOOL) असल्याचं शिक्षण विभागाच्या पडताळणीत समोर आलं आहे. त्यापैकी 100 शाळा कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत तर इतर शाळांबाबत काय कारवाई करायची? याचा निर्णय शिक्षण विभाग लवकरच घेणार आहे. बोगस असलेल्या या शाळांमधे सीबीएसई, आयसीएसई, आयबी आणि राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांचा यामध्ये समावेश आहे. राज्याच्या शिक्षण विभागाने केलेल्या पडताळणीत ही माहिती समोर आली आहे.**

राज्यात अनधिकृतपणे सुरु असणाऱ्या तब्बल 1300 शाळांची तपासणी शिक्षण विभागाने केली. त्यापैकी 800 शाळांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत. यातील सुमारे 43 शाळा पुण्यातील आहेत. कागदपत्रांची तपासणी केली असता त्यात गंभीर त्रुटी आढळून आल्या होत्या. त्यामुळे शाळांची सखोल चौकशी करण्यात आली होती. त्यात शाळेकडे असणारे ना हरकत प्रमाणपत्र म्हणजेच NOC त्यासोबतच शाळांसाठी लागणारं संबंधित मंडळाचं मान्यता प्रमाणपत्र आणि सरकारकडून देण्यात येणारे संलग्न प्रमाणपत्र या तीन कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. या सगळ्या कागदपत्रांपैकी कोणताही कागद नसल्यास त्या शाळेची मान्यता रद्द करण्यात येणार असल्याचं शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी सांगितलं आहे. आतापर्यंत तिन्ही कागदपत्र नसणाऱ्या शाळांना बोगस शाळा म्हणू शकतो. अशा एकूण 77 शाळा निदर्शनास आल्या आहेत. 300 शाळांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.

ज्या शाळांकडे शासनाचं कोणतंही कागदपत्र नाहीत, काही शाळांमध्ये फ्रॉड कागदपत्र सापडले आहेत आणि काही शाळांकडे बोर्डाचं संलग्न प्रमाणपत्र नाही आहे या तीन टप्प्यांवर कारवाई करण्यात येत आहे. या शाळांना बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे. त्यातील 100 शाळांना दंड केला आहे. 100 शाळांना दररोज 10 हजार रुपये एवढी दंडाची रक्कम आहे.



**पालकांनी पाल्याचा प्रवेश घेताना काळजी घ्यावी; मांढरे**

» प्रत्येक पालकांना आपल्या पाल्याला चांगल्या शाळेत शिक्षण द्यायचं असतं. त्यामुळे अनेक पालक खासगी शाळेत पाल्याचा प्रवेश घेतात. मोठ्या रकमेची फी भरतात. कोणत्याही वस्तूंची खरेदी करताना पालक त्या गोष्टीची बारीकसारीक चौकशी करत असतात. मात्र पाल्यांना ज्या शाळेत शिक्षण देतो त्या शाळेसंदर्भात चौकशी करत नाहीत. त्यामुळे पालकांनी यूआयडी पोर्टलवर जाऊन शाळेचा नोंदणी क्रमांक तपासावा, असं आवाहन मांढरे यांनी केलं आहे.

**कारवाईमुळे विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही!**

» या कारवाईमुळे विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची काळजी शिक्षण विभाग घेत आहे. मागील काही वर्षांतच या शाळा सुरु झाल्या आहेत. त्यामुळे त्या त्या परिसरात पर्यायी शाळादेखील उपलब्ध आहेत. त्यामुळे या कारवाईमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नसल्याचं मांढरे यांनी सांगितलं आहे. बंद केलेल्या शाळांमधील विद्यार्थी जवळच्या शाळांमध्ये प्रवेश घेतला असल्याचं सांगितलं आहे.

# घरकुलमधील सदनिकांची सोडत!

## लाभार्थ्यांच्या सदनिकांची संगणकीकृत सोडत, चिखली घरकुलमधील 252 लाभार्थ्यांना मिळाले हक्काचं घर

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी घरकुलच्या माध्यमातुन नागरीकांचे घराचे स्वप्न साकार होत असुन त्याचा उपयोग योग्य पद्धतीने करावा. आपल्या परिसरात स्वच्छता ठेवावी व मिळालेली सदनिका विक्री अथवा भाड्याने देवु नये असे आवाहन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले.**



केंद्र व राज्य शासनाचे सहकार्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्राधिकरण सेक्टर क्र. १७ व १९ चिखली येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असुन या प्रकल्पातील ६ सोसायट्यांच्या इमारती मधील एकुण २५२ लाभार्थ्यांच्या सदनिकांची संगणकीकृत सोडत ०६ एप्रिल २०२३ रोजी प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते काढण्यात आली.

त्यावेळी त्यांनी सर्वांना योग्य ते मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सहा. आयुक्त सुषमा शिंदे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम, प्रशासन अधिकारी दशरथ कांबळे, कनिष्ठ अभियंता शरद मोरमारे, कार्यालय अधिक्षक विष्णु भाट, कॉम्प्युटर ऑपरेटर सुनिता चौगुले पाटील, लिपिक योगिता जाधव यांच्यासह झोनिपु विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच लाभार्थीसह सर्व उपस्थित होते.

यावेळी नियोजित घरकुल सहकारी गृहरचना संस्थासाठी तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात आलेल्या सोसायटी क्र. १४८ इमारत क्र. एफ-१३, सोसायटी क्र. १४९ इमारत क्र. एफ -१७, सोसायटी क्र. १५० इमारत क्र. डी- ८, सोसायटी क्र. १५१ इमारत क्र. डी-१२, सोसायटी क्र. १५२ इमारत क्र. एफ-१४, सोसायटी क्र. १५३ इमारत क्र. एफ-१८ या सर्व सोसायटी अध्यक्ष यांचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

### इमारतीमध्ये सलोख्याचे वातावरण

» या प्रसंगी लाभार्थींनी आता हक्काचे व स्वत:चे घर मिळाल्याने इमारतीमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण करावे, घराचा वापर स्वत: करावा, परिसर स्वच्छ ठेवावा, इमारती भोवती झाडे लावून त्याचे योग्य प्रकारे निगा राखावी व जतन करावे असे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप म्हणाले. यावेळी सुषमा शिंदे सहा.आयुक्त यांनी प्रकल्पाची माहिती, घराचा वापर, येणारे देयके व बँकेचे हप्ते वेळेवर भरणेबाबत मार्गदर्शन केले. कार्यालय अधिक्षक विष्णु भाट यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये जाहिरात फलक लावण्यास परवानगी!

## महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत निर्णय

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने २०२३-२४ या आर्थिक वर्षांत नवीन जाहिरात फलक लावण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या विभागाच्या उत्पन्नात दरवर्षी वाढ होताना दिसून येत आहे. पालिकेच्या इतिहासात प्रथमच या विभागाला १७ कोटी २४ लाखांची वसुली करण्यात यश आले आहे. महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत शहरातील विविध भागांत जाहिरात फलक लावण्यासाठी परवानगी दिली जाते. गेल्यावर्षी परवानगी दिली नव्हती. यावर्षी शासन निर्णयानुसार नवीन जाहिरात फलक लावण्यास परवानगी दिली जाणार आहे.**





सध्या शहरात दोन हजार १०४ अधिकृत जाहिरात फलक अधिकृत आहेत. परवानाधारक फलकांच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत उत्पन्न जमा होत आहे. आकाशचिन्ह विभागाच्या उत्पन्नात गेल्या पाच वर्षांत घसघशीत वाढ झाली आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षांत आकाशचिन्ह विभागाला १७ कोटी २४ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. शहराच्या सौदर्यांत बाधा न येता जाहिरात फलक उभारणे आणि उत्पन्न वाढीसाठी आकाशचिन्ह विभागाच्या वतीने चालू आर्थिक वर्षांत विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी नवीन जाहिरात फलक उभारण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

### शहरातील 433 जाहिरात फलकांचे वाद

»शहराच्या विविध भागातील ४३३ जाहिरात फलकांचे वाद न्यायालयात प्रलंबित आहेत. संबंधितांकडे सुमारे नऊ कोटींची थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल झाली असती, तर उत्पन्नात मोठी वाढ झाली असते.

> आकाशचिन्ह व परवाना विभागात उत्पन्न वाढीसाठी जुनी थकबाकी वसूल करण्यास प्राधान्य दिले. शहरातील जाहिरात फलकांचे सर्वेक्षण केले. काही जाहिरात फलकांची पालिकेकडे नोंद नव्हती. त्याची नोंद करून वसुली केली. आता नवीन जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी दिली जाणार आहे.
>
> -सचिन ढोले उपायुक्त,आकाशचिन्ह व परवाना विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

बीआरटी रस्ते, मेट्रो पिलर, सार्वजनिक स्वच्छतागृहे, रस्ते दुभाजकांमध्ये किऑस्क उभारणे, महापालिकेच्या ५० जागेवर सांगाडे उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

---

# केमिकलयुक्त पाण्याने इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड पालिका हद्दीतून तसेच इंद्रायणी नदी काठच्या गावातील कारखान्यातून इंद्रायणी नदीत मैलमिश्रित केमिकलयुक्त सांडपाणी प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडत असल्याने दि.6 एप्रिल रोजी केमिकलयुक्त पाण्याने इंद्रायणी पुन्हा फेसाळलेली दिसून आली. मागील महिन्या भरात वारंवार इंद्रायणी नदी केमिकलयुक्त पाण्याने फेसाळलेली दिसून येत होती. सद्यस्थितीत सिध्दबेट बंधाऱ्यातून नदीपात्रात पडणाऱ्या पाण्याचा केमिकल युक्त फेस तयार होऊन काही केमिकल युक्त फेस हवेमध्ये उडताना चे चित्र तिथे दिसून येत होते. तसेच तेथील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात फेस निर्माण होताना दिसून येत होता. या केमिकलयुक्त सांडपाण्यामुळे जलचर सृष्टीसह मानवी जीवन ही धोक्यात आले आहे. वारंवार होणाऱ्या या जलप्रदूषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे नियंत्रण मंडळ लक्ष कधी जाणार?याबाबत नागरिकांकडून विचारणा होत आहे.

**» मैलामिश्रित केमिकलयुक्त सांडपाण्यामुळे नदीची ही स्थिती**

**» केमिकलयुक्त सांडपाणी बंद करा मोशीकरांची मागणी**

## संपादकीय »

# सावरकर की मोदी, हा एकच प्रश्न!

***विल्यम शेक्सपिअर याच्या जगप्रसिद्ध 'हॅम्लेट' या नाटकातील राजपुत्र हॅम्लेट हा अनेक अडचणींनी वेढला गेलेला असतो. त्याच्या मनात प्रचंड वादळ उसळलेले असते. काय करावे हे त्याला कळेनासे झालेले असते. अशा वेळी त्याच्या तोंडातून शब्द निघतात, "टू बी ऑर नॉट टू बी, दॅट इज द क्वेश्चन, म्हणजे जगावे की मरावे, हा एकच प्रश्न". अशीच मानसिक अवस्था सध्या गांधी घराण्यातील राजपुत्राची झालेली आहे.***

राजपुत्र म्हणण्याचे कारण असे की, काँग्रेस ही गांधींशिवाय चालत नाही. गांधींच्या नंतर गांधी येत असतात. अगदीच नाईलाज झाला तर दुसऱ्या एखाद्या काँग्रेसजनाला संधी दिली जाते, पण पक्षाची सूत्रे ही गांधी घराण्यातील व्यक्तीकडे असतात. त्यामुळे काँग्रेसने बाहेरून लोकशाहीच्या कितीही गप्पा केल्या तरी तो पक्ष गांधी आडनाव असलेल्या पंडित नेहरूंच्या वारसदारांच्या एकाधिकारशाहीवरच चालत असतो. काँग्रेसमध्ये गांधींना न पटणारे मत मांडणे किंवा त्यांना आव्हान देणे सोपे नसते, याचा अनुभव बऱ्याच काँग्रेसजनांनी घेतला आहे.

सध्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांना चार शहाणपणाच्या गोष्टी सांगणारे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर सतत टीका करत राहिले तर त्यातून आपल्या विरोधी आघाडीचा कसा तोटा होईल, हे समजाविणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही हा अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच त्यांना काँग्रेस सोडून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करावी लागली. राहुल गांधी यांनी मोदी आडनावाच्या माणसांवर बोचरी टीका केल्यानंतर त्यांच्यावर सुरत न्यायालयात अवमानाचा खटला दाखल करण्यात आला. न्यायालयाने त्यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. त्याच्या परिणामस्वरुप लोकसभेतील त्यांची खासदारकी रद्द झाली.

मोदी आडनावाच्या लोकांवर आपण केलेल्या टीकेबद्दल माफी मागणार का, असे विचारले असता त्यांनी मी माफी मागणार नाही, मी गांधी आहे, माफी मागायला मी सावरकर नाही, असे विधान केले होते. त्यानंतर महाराष्ट्रातील भाजपने राहुल गांधी यांच्या विरोधात राज्यभर आक्रमक आंदोलन केले. तरीही त्यांनी आपली ताठर भूमिका सोडली नाही, पण त्यांचा हा ताठरपणा विशेषत: महाराष्ट्रातील सध्या काँग्रेससह महाविकास आघाडीत असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला अडचणीचा ठरला. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी मालेगाव येथील आपल्या भाषणातून काँग्रेसशी जरी आमची आघाडी असली तरी आम्ही सावरकरांचा अपमान सहन करणार नाही, असे राहुल गांधी यांना बजावले. उद्धव ठाकरे यांच्या या विधानानंतर त्यांनी फक्त बोलू नये, कृती करून दाखवावी.

# लुबाडणारे क्लास अन अंध पालक




दहावीची परीक्षा जवळ आल्याबरोबर मुलांपेक्षा पालकच तणावात येतात. मुलांची दहावीची परीक्षा काही दिवसांवर आल्यावर घरातील मनोरंजनाची साधने बंद केली जातात. अनेक घरात तर केबलला रिचार्ज केला जात नाही. अनेकदा ज्याला परीक्षा द्यायची असते तो बिनधास्त असतो आणि घरात कर्फ्यू लागलेला असतो. मुलांची दहावी झाल्याबरोबर पुढे काय करायचे याची काहीही कल्पना मुलांना नसते. ते दर महिन्याला कशात करियर करायचे याचा प्लॅन बदलत असतात. मुलं जे सतत बघतात तेच त्यांना पुढे व्हावेसे वाटते त्यामुळे या वयातल्या मुलांचे काहीच ठरत नाही यानेच पालक हैराण होतात. बारावी नंतर नीट परीक्षा दिली आणि त्यात मेरीटचे गुण मिळाले की मुलांचा नंबर मेडिकलला लागतो याची चर्चा चिंतातुर पालकांनी कुठेतरी ऐकलेली असते त्यामुळे दहावी नंतर पुढची दोन वर्ष निटसाठी कोचिंग क्लास लावण्याची भुणभुण सुरु होते.

कोचिंग क्लासवाले या काळातच आपल्या धंद्याचा श्रीगणेशा करतात. प्रवेशपूर्व परीक्षा आणि पुढे शिष्यवृत्ती अश्या लागोपाठ काही परीक्षेचे आमिष विद्यार्थी अन पालकांना दिले जाते. त्याच काळात वृत्तपत्रात आमच्या क्लासचे किती विद्यार्थी डॉक्टर झालेत याच्या पानभर जाहिराती स्थानिक वृत्तपत्रातून दररोज भेटीला येतात. रेडिओ,वृत्तपत्रे,रस्त्यावरील होर्डिंग्स यावरील जाहिरातींचा एवढा मारा होत असतो की इच्छा नसताना सुद्धा मुले अन पालकांना त्याची भुरळ पडते. दहावीच्या परीक्षेच्या आधी किंवा नंतर कॉलनी किंवा अपार्टमेंट मधील असंख्य पालकांनी कोचिंग क्लासवा रजधुळ झाडलेली असते , त्याच्या चर्चा घरात बसूनही कानावर पडल्याने आपणही पिंट्यासाठी क्लास लावला पाहिजे असा श्रीमंतीचा घोषा सुरु झाल्यावर कंटाळून पालकांचे पाय क्लासकडे वळतात. पालक म्हणजे तातडीचा गरजवंत असल्याचे मानून त्याला लाखो रुपयांचे पॅकेज दाखवून सुलभ हप्त्याने कापण्याचे सोपस्कार केले जातात.



मुलांना बारावी नंतर नीट परीक्षा देऊन मेडिकल कडे जाण्याचे स्वप्न पूर्ण करायचे असल्याने एकदा क्लासवाल्यांच्या हातात मान दिल्यावर ती कशी कापली जाईल याची पर्वा करणे पालकांच्या हातात नसते. मुलाचे भवितव्य हा सूर्याएवढा गोल दिसत असतो त्यामुळे त्याच्यासाठी कायपण करण्याची तयारी प्रत्येक पालकाने ठेवलीच पाहिजे अशी शिकवण त्याला आधीच समाजातून मिळाली असल्याने बिचारा पालक कोणत्याही कडावर बसायला तयार असतो. निटची तयारी करून घेण्यासाठी किमान दोन लाख शुल्क सांगितले जाते आणि सोबत शिष्यवृत्ती परीक्षा देण्याची संधी दिली जाते. यातून पाल्य किती हुशार आहे हे कळते म्हणजे पुढे त्यावर जास्त मेहनत घेण्याची गरज नसते. वरून शिष्यवृत्ती परीक्षेत मिळणाऱ्या गुणांवरून शुल्क कमी करण्याचे लॉलीपॉप दिले जाते. क्लासवाल्यांची ही एवढी सुंदर प्रॅक्टिस असते की न फसता पालकाची तिथून सुटकाच होत नाही.

दहावी नुकतीच उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची खरी परीक्षा इथंच सुरु होते. अकरावी,बारावीचा अभ्यासक्रम आणि डोक्यावर नीटशी टांगती तलवार याचा समतोल साधताना त्याची मानसिक,शारीरिक अवस्था फार केविलवाणी होऊन जाते. तिकडे शिष्यवृत्तीचे गाजर घेऊन पालकाला किमान सव्वा ते डिड लाखाचा भुर्दंड क्लासने दिलेला असतो. दहा,पंधरा हजार भरून मुलाचा प्रवेश पक्का करून घेतलेल्या पालकाला पुढचे हप्ते भरण्याच्या तयारीत लागावे लागते. एकाचवेळी शंभर किंवा दीडशे मुलांना क्लासमध्ये कोंबून त्यांची नीट तयारी करून घेण्यासाठी प्रत्येकी दीडलाख खरोखर लागत असतील का ? हा प्रश्न या व्यवस्थेत कोणालाही विचारण्याची सोय नसते. " मुकी जेवली,हाक ना बोंब " असा हा इमोशनल फसवणुकीचा गेम बनला आहे. बरं मुलांना लाखभर रुपये घेऊन शिकवणाऱ्या तात्पुरत्या शिक्षकांचे ज्ञान किती ? त्यांना वेतन किती ? नियमित होते की नाही ? हे काहीही विचारण्याची सोय नाही.

ज्या पालकांना जुजबी सामान्य ज्ञान असते ते पालक तरी एकापेक्षा अधिक ठिकाणी जाऊन सल्ला घेतात. काही जवळच्या मित्रांशी बोलतात मात्र ज्यांना यातले काहीही कळत नाही ,श्रीमंत अडाणी किंवा मध्यमवर्गीय पालकांचे काय होत असेल याचा विचार करूनच अंगावर काटा येतो.

# मोबाईल : माणसाचे सहावे इंद्रिय

**आज मोबाईल माणसांच्या खिशात नाही, मोबाईलच्या खिशात माणसं असतात. मोबाईलच्या चौकटीत जगणाऱ्या माणसांनी आज मोबाईल हे सहावे इंद्रिय म्हणून घोषित करावे. अगदी ३० वर्षांपूर्वी प्रतिष्ठेचं लक्षण असलेला मोबाईल आज हातागणीक झालेला आहे. अनेकदा एकच व्यक्ती दोन किंवा तीन मोबाईलची मालक असणंही सहजमान्य झालेलं आहे.**

इंटरनेट पेमेंट केल्यावर बँकेतली शिल्लक पाहण्यापुरते एसएमएस उरले आहेत. 'कमरेला पेजर आणि गावाला चक्कर' नव्वदच्या दशकाच्या अखेरीस पेजरधारी मानवाकृती एखाद्या म्यानातून तलवार उपसावी अशा आवेशात प्लास्टिकच्या कमरेला लटकवलेल्या चौकोनी कॅबिनेटमधून रिंग वाजवणारा पेजर बाहेर काढीत. पेजरला सोन्या-चांदीची चैन लावणं ही काही पेजरधाऱ्यांसाठी चैनच होती. मोबिलिंक किंवा ईझीकॉलच्या पेजरवरचा नंबर पाहून एमटीएनएलचे लाल डबे शोधत आलेल्या नंबरवर फोन करणं हे सामाजिक प्रतिष्ठेचं लक्षण होतं, तर मोटोरोला, नोकियानं वॉकीटॉकीसदृश्य मोबाईल आणून पेजरयुग संपवलं. मॉट्स, ऑरेंजचा काळही दोन दशकांपूर्वीचा.'तीन रुपयांत चाय कटिंग आणि दोन रुपयांत एक फोन कॉल' अशा जाहिरातींनी मुंबईच्या स्टेशनातल्या जागा हेरलेल्या



होत्या. उत्क्रांतीवादात माकडाचा माणूस होत गेला. आता त्यापुढं माणूस झालेल्या माणसाचा मोबाईल होतोय. सिक्थ सेन्सनंतर हे सातवं इंद्रिय माणसाच्या आज खिशात असतंय. त्यामुळे एकच डोईजड झालं असताना अशीच आणखी दोन-तीन मोबाईलरूपी इंद्रियं बाळगणाऱ्यांचं कौतुकच व्हावं. मोबाईलच्या दुष्परिणामांची चर्चा जगभर सुरू असताना मोबाईलचा शोध लावणाऱ्या मार्टिन कूपर यांनी मोबाईलच्या वाढत्या व्यसनामुळे चिंता व्यक्त केलीय. मोबाईलचा वापर गरजेइतकाच करण्याचं त्यांनी सुचवलंय. मग गरज कोणती व्हिडीओ पाहण्याची, करण्याची, चॅटिंगची, सिनेमे पाहण्याची, संवाद साधण्याची, सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहण्याची अशी सगळीच आहे. या गरजांनी सगळं जगणंच व्यापून टाकलंय. आज चार मित्र मैत्रिणी प्रत्यक्ष दुर्मीळ होऊन भेटले तरी ते चौघे इतर चार जणांशी आणि बाहेरच्या जगाशी आपापल्या मोबाईलरूपी चौकटीतून आपापले बाहेरच्यांशी संवाद साधत असतात.

लोकल ट्रेनच्या प्रवासात ऑफिसातनं एकत्र सुटलेले मित्र, सहकारी आपसात बोलत नसतात, तेसुद्धा इतरांशी आपल्या चौकटीतून संवाद साधतात. हे बोलणं आपलं आपल्याशी नसतंय, ते आपल्यातल्या लोकांशीही नसतं, ते बाहेरच्यांशी असतं. व्हर्च्युअल जगातल्या लोकांनी परस्परांशी बोलावं, आपापली गाऱ्हाणी मांडावीत, सुख-दुःखं सोशल मीडियाच्या चव्हाट्यावर मांडावीत, या वेदना-संवेदनांना लाईक्स मिळावेत,

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# लोकसभा-विधानसभेसाठी भाजपचा निर्धार!

## विरोधकांना भुईसपाट करण्यासाठी आखला मास्टर प्लॅन

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपचा आज ४४ वा स्थापना दिवस साजरा होत आहे. त्यामुळे देशभरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान वर्धापनदिनानिमित्त भाजपने आगमी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. भाजपने दोन्ही निवडणुकांसाठी त्यांचे लक्ष सांगितले आहे.**



महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा तर विधानसभेच्या २०० जागा जिंकायच्या आहेत, असा निर्धार महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. ते भाजपच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. यावर ठाकरे गटाच्या नेत्यांनी टीका केली आहे.

बावनकुळे यांचे स्वप्न स्वप्नचं राहणार, असे विनायक राऊत म्हणाले.

नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता भाजप-शिवसेना युतीच्या माध्यमातून लोकसभेच्या संपूर्ण ४८ जागा जिंकण्यासाठी जीवाचे राण करायचे आहे. तसेच देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या समन्वयाने २०२४ मध्ये संपूर्ण बहुमताचं सरकार आणायचे आहे. २०० प्लस जागा आपल्याला जिंकायच्या आहेत. यासाठी ३ कोटी सदस्यसंख्या असलेला भाजप आपल्याला तयार करायच आहे.

यापूर्वी आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा शिवसेनेच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं होत. पण त्यानंतर लगेचच असं काही झालेलं नाही, असं सांगत त्यांनी सारवासारवही केली होती.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंदशेखर बावनकुळे यांनी मुंबईमध्ये जिल्हा प्रसिद्धीप्रमुखांच्या बैठकीत मोठे वक्तव्य केलं होतं. यामध्ये त्यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचा फॉर्म्युल्याबाबत जागावाटप सांगितलं होतं.

यावेळी बोलताना त्यांनी भाजप २४० जागा लढवणार तर ४८ जागा शिवसेनेला देणार असल्याचे सांगितलं होतं. त्यानंतर बावनकुळेंच्या वक्तव्याने युतीत वाद निर्माण होऊ नये म्हणून भाजपने भाषणाचा व्हिडीओच सोशल मीडियावरुन हटवला होता.

### विरोध झाल्यानंतर केली सारवासारव

»"आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा २४० जागा लढवण्याचा विचार करत असल्याचं वक्तव्य मी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी केलं होतं. निवडणुकीच्या वेळी जागावाटपाचा विचार होईल. शिंदे गटाबरोबर असलेल्या आमदारांच्या जागांपेक्षा ज्या आणखी जागा शिंदे गटाकडे जातील, त्यांना भाजपाने केलेल्या तयारीचा उपयोग होईल."

---

# शिक्षकी पेशाला काळिमा!

## चौथीत शिकणाऱ्या चार अल्पवयीन मुलींवर दोन नराधम शिक्षकांकडून लैंगिक अत्याचार

। अकोला।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



जिल्ह्याच्या बार्शीटाकळी तालुक्यात धामणदारी येथील जिल्हा परिषद शाळेत चौथ्या वर्गातील चार अल्पवयीन विद्यार्थिनींवर दोन नराधम शिक्षकांनी लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बार्शीटाकळी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली.

शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या घटनेमुळे संताप व्यक्त केला जात आहे.धामणदरी येथे जिल्हा परिषद शाळा आहे. या शाळेत चौथ्या वर्गात शिकत असलेल्या ४ विद्यार्थिनींवर त्यांच्याच शाळेतील दोन शिक्षकांकडून सतत अश्लील चाळे होत होते. दोन्ही शिक्षक मुलींना एकटे पाहून कुकर्म करत होते. वारंवार घडणाऱ्या या कृत्यामुळे अल्पवयीन मुलींच्या मनात भीती पसरली. त्यामुळे पीडित मुली शाळेत जात नव्हत्या. पालकांनी त्यांना शाळेत न जाण्याचे कारण विचारल्यावर त्या चौघींपैकी एकीने वारंवार घडत असलेला प्रकार आपल्या आईला सांगितला. हे ऐकताच कुटुंबीयांना धक्का बसला. त्यांनी तात्काळ बार्शीटाकळी पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी पीडित मुलींच्या तक्रारीनंतर शिक्षक राजेश रामभाऊ तायडे (४५), सुधाकर रामदास ढगे (५३) दोघेही रा. अकोला यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

# महसूल अधिकाऱ्यांचे आंदोलन स्थगित

## मागणीला तत्वतः मान्यता, एप्रिलअखेर कार्यवाही

। बुलढाणा ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



राज्यातील हजारो महसूल अधिकाऱ्यांनी मागील ३ एप्रिलपासून सुरू असलेले आपले कामबंद आंदोलन आज, गुरुवारी मागे घेतले. शासनाने नायब तहसीलदारांना ४८०० रुपये ग्रेड पे देण्यास तत्वतः मान्यता देत त्यासंदर्भातील कार्यवाही एप्रिलअखेर करण्याचे ठोस आश्वासन दिले आहे.

त्यामुळे हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश बगळे, राहुल मुंडके, मनोहर पोटे व बाळासाहेव वाकचोरे यांनी जाहीर केले.यापूर्वी आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी ( दि. ५) महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व पदाधिकारी यांच्यात झालेली चर्चा फलदायी ठरली. मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांनी 'ग्रेड-पे'च्या मागणीला मान्यता दिल्याचे बगळे यांनी स्पष्ट केले. यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही करण्यास व शासन निर्णय काढण्यासाठी एप्रिलअखेर पर्यंतचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात येत असल्याचे त्यांनी जाहीर केले.

दरम्यान, जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी तहसीलदार व नायब तहसीलदार आज कामावर रुजू होत असल्याचे जिल्हाध्यक्ष आर.एन. देवकर यांनी सांगितले.

# 'राष्ट्रीय पक्षा'चा दर्जा मिळवण्यासाठी आप'ची कर्नाटक उच्च न्यायालयात धाव

## ईडी, सीबीआयची ताकद वाढणार?

।बेंगळुरू । महाईन्यूज ।



कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आम आदमी पक्षाने (आप) राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळावी यासाठी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. 'आप'चे कर्नाटक संयोजक पृथ्वी रेड्डी यांनी दाखल केलेल्या याचिकेत म्हटले की, पक्ष राष्ट्रीय पक्ष होण्यासाठी सर्व निकषांची पूर्तता करतो, परंतु निवडणूक आयोगाने हा दर्जा देण्यास नकार दिला आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एखाद्या पक्षाला सार्वत्रिक निवडणूक किंवा विधानसभा निवडणुकीत चार किंवा अधिक राज्यांमध्ये झालेल्या वैध मतांच्या किमान सहा टक्के मते मिळाल्यास आणि लोकसभा निवडणुकीत किमान चार जागा जिंकल्यास त्याला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली जाऊ शकते.

असा पक्ष जो कोणत्याही राज्याचा किंवा राज्यांचा आहे. किमान तीन वेगवेगळ्या राज्यांमधून सार्वत्रिक निवडणुकीत लोकसभेच्या एकूण जागांपैकी किमान २ टक्के जागा जिंकणे; किंवा किमान चार राज्यांमध्ये त्याला राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळायला हवी, अशा पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळतो.

याचिकेत म्हटले की, आम आदमी पक्षाने दिल्ली, पंजाब, गोवा आणि गुजरातमध्ये झालेल्या मागील निवडणुकांमध्ये केलेल्या कामगिरीने राष्ट्रीय पक्षासाठी आवश्यक बाबींची पूर्तता केली आहे. पक्षाकडून वारंवार विनंती आणि अर्ज करूनही निवडणूक आयोग 'आप'ला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता देण्यास दिरंगाई करत असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. 'आप'ला ठराविक मुदतीत राष्ट्रीय पक्षाचा दर्जा देण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे.

# मुस्लिमांचं कोणतंही आरक्षण संपणार नाही!

## निवडणुकीपूर्वी अमित शहांचं मोठं आश्वासन

।नवी दिल्ली महाईन्यूज ।

**कर्नाटकातील निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा (AMIT SHAH) यांनी कर्नाटकात 4 टक्के मुस्लिम आरक्षण (MUSLIM RESERVATION) संपणार नसून आता फक्त पसमांदा मुस्लिम समाजालाच आरक्षण मिळेल, असं आश्वासन दिलंय.**

जे पसमांदा मुस्लिम नाहीत, त्यांना EWS आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना दिलेल्या 10 टक्के आरक्षणात वाटा मिळेल, असंही म्हटलंय. जमियत उलामा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना महमूद असद मदनी यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम नेते आणि विचारवंतांच्या 16 सदस्यीय शिष्टमंडळानं मंगळवारी संध्याकाळी उशिरा गृहमंत्री अमित शहा यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.



या शिष्टमंडळानं जातीय दंगली, द्वेष मोहीम, इस्लामोफोबिया, मॉब लिंचिंग, समान नागरी संहिता, मदरशांची स्वायत्तता, कर्नाटकातील मुस्लिम आरक्षण, काश्मीरमधील सद्यस्थिती आणि वक्फ मालमत्तेचं संरक्षण या विषयांवर अमित शहांशी चर्चा केली. तासाभराहून अधिक काळ चाललेल्या या बैठकीत मौलाना कलीम सिद्दीकी आणि उमर गौतम यांच्या जामिनाचा मुद्दाही उपस्थित केला

.मुस्लिम समाजावर कोणताही भेदभाव किंवा अन्याय होणार नाही, असं आश्वासन अमित शहा यांनी शिष्टमंडळाला दिलं. यावेळी बोलताना जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना महमूद मदनी म्हणाले, 'देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या बहुसंख्य समाजाला निराशेच्या गर्तेत ढकलण्याचे प्रयत्न सुरू असून द्वेष आणि जातीयवादाची खुलेआम अभिव्यक्ती देशाची प्रगती नष्ट करत आहे.

### अमित शहांशी चर्चा

**या शिष्टमंडळानं जातीय दंगली, द्वेष मोहीम, इस्लामोफोबिया, मॉब लिंचिंग, समान नागरी संहिता, मदरशांची स्वायत्तता, कर्नाटकातील मुस्लिम आरक्षण, काश्मीरमधील सद्यस्थिती आणि वक्फ मालमत्तेचं संरक्षण या विषयांवर अमित शहांशी चर्चा केली. तासाभराहून अधिक काळ चाललेल्या या बैठकीत मौलाना कलीम सिद्दीकी आणि उमर गौतम यांच्या जामिनाचा मुद्दाही उपस्थित केला**

# कोविडच्या वाढत्या केसेसमुळे केंद्र सरकार अलर्ट मोडवर!

## राज्यांसोबत महत्त्वाची बैठक घेणार

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशामध्ये कोरोनाच्या वाढत्या संख्येमुळे केंद्राची डोकेदुखी वाढली आहे. केंद्र सरकार अलर्ट मोडवर आलेलं असून उद्या केंद्रीय आरोग्य मंत्री राज्य सरकारांसोबत बैठक घेणार आहेत.**





देशामध्ये कोरोना विषाणूचं संक्रमण वाढत असल्याने केंद्र सरकार सतर्क झालेलं आहे. आज दिल्लीमध्ये एक महत्त्वाची बैठक पार पडली. त्यानंतरच उद्या (शुक्रवारी) दुपारी १२ वाजता केंद्रीय आरोग्य मंत्री राज्यांच्या परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. उद्याच्या बैठकीमध्ये सर्व राज्यांच्या आरोग्य मंत्र्यांचा सहभाग असेल. बैठकीत कोरोनाची परिस्थिती, वाढते रुग्ण, उपाययोजना आणि तयारी; याबाबत चर्चा होणार आहे. देशात एका दिवसामध्ये कोरोनाचे ५ हजार ३३६ नवे रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे देशामध्ये आतापर्यंत संक्रमित रुग्णसंख्या ४ कोटी ४७ लाख ३९ हजार ५४ इतकी झाली आहे. मागच्या १९५ दिवसांमध्ये सर्वाधिक रुग्णसंख्या वाढलेली आहे.

देशभरात सध्या उपचार घेत असलेल्या रुग्णांची संख्या २५ हजार ५८७ पर्यंत पोहोचली आहे. देशात मागच्या वर्षी २३ सप्टेंबर रोजी ५ हजार ३८३ केसेस समोर आलेल्या होत्या. आज सकाळी जारी झालेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र आणि कर्नाटकात प्रत्येकी दोन कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर पंजाब आणि केरळ राज्यात एक-एक रुग्ण मृत पावला आहे. त्यामुळे देशातील कोरोन मृतांचा आकडा आता ५ लाख ३० हजार ९२९ इतका झाला आहे.

सध्या देशात २५ हजार ५८७ कोरोना रुग्णांवर उपचार सुरु आहेत. रुग्ण बरे होण्याचा राष्ट्रीय दर ९८.७५ टक्के आहे. तर देशातील संक्रमणाचा दैनंदिन दर ३.३२ टक्के असून साप्ताहिक दर २.८९ टक्के आहे. तर मृत्यूदर १.१९ टक्के इतका आहे.

# गुणरत्न सदावर्ते यांना कोणताही तातडीचा दिलासा देण्यास हायकोर्टाचा नकार!

। गुवाहाटीः । महाईन्यूज । प्रतिनिधी।



वकिलांसाठीच्या आचारसंहितेचं उल्लंघन केल्याच्या आरोपांखाली शिस्तभंगाच्या कारवाईमुळे अडचणीत आलेल्या डॉ. गुणरत्न सदावर्ते यांना कोणताही दिलासा देण्यास हायकोर्टानं नकार दिला आहे.

याप्रकरणी सदावर्तेंना बार काउन्सिल ऑफ इंडियाकडे दाद मागण्याचे आदेश हायकोर्टानं दिले आहेत. मात्र त्यांची याचिका प्रलंबित ठेवत भविष्यात पुन्हा हायकोर्टात दाद मागण्याकरता पर्याय त्यांच्यासाठी खुला ठेवलाय.

एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनादरम्यान (ST WORKERS PROTEST) सदावर्ते यांनी माध्यमांसमोर वेळोवेळी बेजबाबदार विधानं केली होती. तसेच त्यावेळी वकिलांसाठीचा पांढरा बँड परिधान करून सार्वजनिक ठिकाणी वावरताना वकिलांसाठीच्या आचारसंहितेचं त्यांनी उल्लंघन केलं असा आरोप करत त्यांच्याविरोधात तक्रार करण्यात आली होती. पिंपरी चिंचवड वकील संघटनेचे अध्यक्ष सुशील मंचेकर यांनी सदावर्ते यांच्याविरोधात महाराष्ट्र आणि गोवा बार काउन्सिलकडे याबाबतची तक्रार केली होती. त्यावर काउन्सिलच्या तीन सदस्यीय शिस्तपालन समितीनं सदावर्ते यांना वकील कायद्याच्या कलम 35 नुसार, गैरवर्तणुक प्रकरणी दोषी ठरवलं. तसेच दोन वर्षांसाठी त्यांची सनद निलंबित करण्याचा निर्णय घेतला.

# 'मृत्यूनंतरही अनेकांच्या स्वप्नात यायची दिव्या'!

: बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिव्या भारतीचं जाणं हे तिच्या चाहत्यांसाठी खूपच धक्कादायक होते. तिनं आत्महत्या का केली याचे कारण नेहमीच सगळ्यांसाठी गुपित राहिले. पोलिसांनी केलेल्या तपासातातून वेगवेगळ्या गोष्टी समोर आल्या. ज्यांनी दिव्याला पाहिले, तिच्यासोबत संवाद साधला त्यांचा अनुभव पूर्ण वेगळा होता. दिव्याचे व्यक्तिमत्व हे कमालीचे प्रभावी होते. असे त्यांचे म्हणणे होते. मात्र तिनं हे करण्यामागील खरे कारण खूपच वेगळे असल्याची चर्चा अजूनही दबक्या आवाजात होतच असते. वयाच्या 17 व्या वर्षी दिव्यानं बॉलीवूडमध्ये इंट्री केली होती. तिनं विश्वात्मा चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पाऊल ठेवले. त्यानंतर तिच्याकडे वेगवेगळ्या चित्रपटांची ऑफर होती. मात्र त्याच दरम्यान तिनं तिच्या राहत्या घराच्या बाल्कनीतून उडी मारून स्वताला संपविल्याचे दिसून आले. दिव्याची आत्महत्या हे अजूनही गुढ असल्याचे सांगण्यात येते.

दिव्या जवळ खूप सारे प्रोजेक्टस बाकी होते. तिच्या अकाली मृत्यूनंतर निर्मात्यांना ते प्रोजेक्ट आवरते घ्यावे लागले. काहींनी तो आर्थिक तोटा भरुन काढण्यासाठी दुसऱ्या अभिनेत्रींची तिच्या जागी निवड केली आणि ते चित्रपट प्रदर्शित केले होते. त्यापैकी एक चित्रपट होता लाडला दिव्या सोबत या चित्रपटाचे ९० टक्के शुटिंग पूर्ण करण्यात आले होते. मात्र तिच्या मृत्यूनंतर श्रीदेवीला घेऊन तो चित्रपट पुन्हा शुट करण्यात आला होता.श्रीदेवीनं तर त्या सेटवरील धक्कादायक अनुभव सांगितले होते. असं



म्हटलं जायचं की, श्रीदेवी त्या डायलॉगवर सारखी अडखळत असे ज्यावर दिव्यालाही अनेक रिटेक घ्यावे लागले होते. काही अनुभवानंतर त्या सेटवर धार्मिक विधी करण्यात आल्याची चर्चा आजही चाहते करत असतात. दिव्या भारतीनं तिचं शिक्षण सोडून फिल्म इंडस्ट्रीमध्ये पाऊल ठेवलं होतं. तिला आपण या इंडस्ट्रीमधील मोठी अभिनेत्री होऊ असं स्वप्न उराशी बाळगलं होतं. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षापासून दिव्यानं बॉलीवूडची वाट धरली. तिच्या काही चित्रपटांना प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. ऋषी कपूर, शाहरुख खान यांच्यासोबत तिनं काम केलं. गोविंदासोबतही ती झळकली होती.

# मराठी मालिकांमध्ये काम करण्यावरुन भडकली ऋता दुर्गुळे

मराठीमधील तरुण अभिनेत्रींमध्ये ऋता दुर्गुळेचं नाव आवर्जुन घेतलं जातं. ऋताचा इथवरचा प्रवास खरंच कौतुकास्पद आहे. विविध मराठी मालिकांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारत तिने प्रेक्षकांना आपलंस केलं. मराठी मालिकांनी तिला खरी ओळख मिळवून दिली. 'दुर्वा', 'फुलपाखरु', 'मन उडू उडू झालं' अशा मालिकांमध्ये तिने काम केलं. पण मराठी मालिकांच्या कामाबाबत तिने आता नाराजी व्यक्त केली आहे.

सध्या ऋता मालिकांपासून दूर आहे. तिचा एक मराठी चित्रपट प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. वैभव तत्त्ववादीबरोबर ती 'सर्किट' चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटानिमित्त 'मित्र म्हणे' या युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत ऋताने मराठी मालिकांबाबत भाष्य केलं. तसेच काही गोष्टी बदलण्याची गरज आहे हेही सांगितलं.ऋता म्हणाली, "मराठी मालिकांच्या कामाबाबत एक गोष्ट बदलली पाहिजे असं मला मनापासून वाटतं. ती गोष्ट म्हणजे कामाचं नियोजन. मालिकांमध्ये काम करत असताना कलाकाराला १२ तासांची शिफ्ट असते. शिफ्टच्या आधी कलाकाराला अर्धा तास लवकर सेटवर बोलावण्यात येतं. पण तो अर्धातास शिफ्टमध्ये गृहित धरला जात नाही. ही काम करण्याची पद्धत बदलावी असं मला वाटतं. मी माझी पहिली मालिका केली तेव्हा मी १८ वर्षांची होती. माझी पहिला मालिका संपली तेव्हा माझं वय वर्ष २२ होतं. त्यानंतर वयाच्या २७व्या वर्षी माझी दुसरी मालिका संपली. त्यामुळे मालिकांमध्ये काम करण्याची पद्धत माझ्या अगदी डोक्यात आहे".



"१३ तासंच काम करायचं आहे म्हणत कलाकारांना अशावेळी गृहित धरलं जातं. पण मला ही काम करण्याची पद्धत पटत नाही. जेव्हा मी माझ्या दुसऱ्या मालिकेमध्ये काम करत होते तेव्हा माझे १२ तास झाले की, मी सेटवरुन निघून जायचे. त्यासाठी माझं नावही खराब करण्यात आलं असावं. जो या क्षेत्रामध्ये खऱ्या गोष्टींसाठी लढतो त्याचं नाव खराब करण्यात येतं. जे कलाकार बोलतात त्यांचा आवाज दाबला जातो".

# बॉक्स ऑफिसवर चित्रपट फ्लॉप का होतात?

बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान सध्या त्याच्या आगामी 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी सलमान एका अवॉर्ड शोच्या पत्रकार परिषदेत सहभागी झाला होता. पत्रकार परिषदेत दबंग खान मनमोकळेपणाने बोलला. बॉक्स ऑफिसवर चित्रपट सतत फ्लॉप का होतात यामागचे कारणही सलमाने उघडपणे सांगितले आहे.चित्रपट का फ्लॉप होतात? अवॉर्ड शोच्या पत्रकार परिषदेत फ्लॉप हिंदी चित्रपटांबद्दल बोलताना सलमान म्हणाला, 'आजकाल चुकीचे चित्रपट बनवले जात आहेत. त्यामुळेच ते बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरतात. चित्रपट निर्मात्यांना वाटते की ते उत्तम चित्रपट बनवत आहेत, पण तसे नाही.हिंदी चित्रपट चालत नाहीत, हे मी खूप दिवसांपासून ऐकत आहे. वाईट चित्रपट बनवले तर कसे चालतील? प्रत्येकाला वाटते आपण 'मुगल-ए-आझम', 'शोले', 'हम आपके है कौन' आणि 'दिलवाले दुल्हनिया' सारखे सुपरहिट चित्रपट बनवत आहोत. पण तसं नाहीये. कारण आजकाल असे काही दिग्दर्शक आहेत ज्यांना भारत फक्त कुलाबा ते अंधेरपर्यंतच असल्यासारखा वाटतो. पण तो भारत नाहीये. भारत हा रेल्वेस्टेशनच्या पलीकडून सुरु होतो. आजच्या दिग्दर्शकांना वाटते की ते मस्त पिक्चर काढतील. पण असे होताना दिसत नाही. असेही सलमान म्हणाला. यावेळी सलमान खानने त्याच्या आगामी 'किसी का भाई की जान' या चित्रपटाचे प्रमोशनही केले. सलमान म्हणाला 'हा चित्रपट २१ एप्रिलला प्रदर्शित होत आहे. तुम्ही सगळे चित्रपट बघायला जा. मोठ्या मेहनतीने हा चित्रपट बनवला आहे. ही क्लिप विसरू नका, नाहीतर नंतर तुम्ही म्हणाल तुम्ही किती बोलत होता आणि तुम्ही स्वतः कोणत्या प्रकारचा चित्रपट बनवला आहे. सलमानचे बोलणे ऐकून तिथे उपस्थित असलेले लोक जोरजोरात हसायला लागले.



सलमानचा आगामी चित्रपट 'किसी का भाई किसी की जान' हा चित्रपट फरहाद सामजी यांनी दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटाचा निर्माता सलमान खान आहे. हा मल्टीस्टारर चित्रपट आहे. या चित्रपटात राघव जुयाल, शहनाज गिल, पलक तिवारी, सिद्धार्थ निगम आणि जस्सी गिलसारखे स्टार्स देखील आहेत. सलमान खान आणि पूजा हेगडे या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. तसेच सलमानचा 'टायगर ३' चित्रपटही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे

# मी ८० वर्षांची झाले तरी शाहरुखबरोबर..."; राणी मुखर्जीने व्यक्त केली मनातली इच्छा

बॉलीवूड अभिनेत्री राणी मुखर्जी सध्या तिचा नुकताच प्रदर्शित झालेला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटाच्या यशाचा आनंद साजरा करत आहे. आशिमा छिब्बर दिग्दर्शित या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली आहे. चित्रपटातील तिच्या दमदार अभिनयासाठी राणीचे खूप कौतुक होत आहे. 'राजा की आयेगी बारात'मधून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या राणीला शाहरुख खानसोबत 'कुछ कुछ होता है'मधून यश मिळाले. नुकतेच राणीने शाहरुखबरोबर चित्रपट करण्यावरून मनातील सुप्त इच्छा व्यक्त केली आहे.मुलाखतीत जेव्हा राणीला विचारले गेले की, ती शाहरुख खानसोबत आणखी एक चित्रपट करण्यास तयार आहे का, तेव्हा राणीने उत्तर दिले की, लेखकांनी एक अशी प्रेमकथा घेऊन यावी ज्यात माझ्याबरोबर शाहरुखही असेल. मला वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत शाहरुखबरोबर रोमान्स करायला आवडेल, असेही राणी म्हणाली. राणी मुखर्जी आणि शाहरुख खान यांनी 'कुछ कुछ होता है', 'चलते चलते' आणि 'कभी अलविदा ना कहना'सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. पिंकविलाशी बोलताना राणीने दिलखुलास गप्पा मारल्या. दोन चित्रपटांमध्ये एवढा वेळ का घेतेस, या प्रश्नावर राणी म्हणाली, 'मी एवढा वेळ घेते, कारण प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांबाबत मी प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांची वाट पाहते. खरे तर मी घरातच असते. मी जगभरातील सिनेमा पाहते. काय येत आहे आणि जगभरातील लोक काय कामे करत आहेत हे मी बघत असते,' असे राणी म्हणाली.



# ‘इम्पॅक्ट प्लेयर’ सुयश शर्मा चमकला!

## वरुणच्या फिरकीनं RCB ची उडवली दाणादाण; कोलकाताचा दणदणीत विजय

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ईडन गार्डनमध्ये यंदाच्या आयपीएल सीजनचा ९ सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात रंगला. आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर कोलकाताने गुरबाज, शार्दुल ठाकूरच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या जोरावर २० षटकांत ७ विकेट्स २०४ धावांची मजल मारली होती. त्यानंतर दोनशे पार धावांचं लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या आरसीबीच्या फलंदाजांची कोलकाताच्या फिरकीपटूंनी दाणादाण उडवली.

सुनील नारायणने विराट कोहलीचा त्रिफळा उडवला. त्यानंतर वरुण चक्रवर्तीने आरसीबीच्या टॉप ऑर्डर फलंदाजांच्या दांड्या उडवल्या. कोलकाताच्या गोलंदाजांच्या चमकदार कामगिरीमुळं आरसीबीचा पराभव झाला. आरसीबीचा आख्खा संघ १७.४ षटकात १२३ धावांवर गारद झाला आणि कोलकाता नाईट रायडर्सने पहिल्या विजयाचा नारळ फोडला.

आरसीबीसाठी सलामीला उतरलेल्या विराट कोहली आणि कर्णधार फाफ डु प्लेसिसने चांगली सुरुवात केली होती. मात्र, सुनील नारायणच्या फिरकीने विराट कोहलीला २१ धावांवर क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर कर्णधार डु प्लेसिस २३ धावांवर बाद झाला. आरसीबीचा संघ कठीण परिस्थितीचा सामना करत असताना चक्रवर्तीने पुन्हा एकदा फिरकीची कमाल दाखवली आणि ग्लेन मॅक्सवेल आणि हर्षल पटेलला स्वस्तात माघारी पाठवलं. ग्लेन मॅक्सवेल ५ तर हर्षल पटेल शून्यावर बाद झाला.त्यानंतर सुनील नारायणने शाहबाज अहमदलाही एका धावेवर बाद केलं. पण सामन्यामध्ये इम्पॅक्ट प्लेयर सुयश शर्माने अधिक रोमांच वाढवला. अनुज रावत आणि दिनेश कार्तिकला सुयशने बाद केल्यानंतर कोलकाताचा विजय जवळपास निश्चित झाला होता. कोलकातासाठी सुनील नारायणे दोन विकेट्स घेतल्या. वरुण चक्रवर्तीने फिरकीची कमाल दाखवत चार विकेट्स घेण्याची चमकदार कामगिरी केली. तर इम्पॅक्ट प्लेयरला सुयश शर्माला ३ विकेट्स मिळाल्या. विशेष म्हणजे या सामन्याचा खरा हिरो शार्दुल ठाकूरलाही एक विकेट मिळाली.



# पाकिस्तानमध्ये वादळी खेळी करणाऱ्या फलंदाजाची केकेआरमध्ये एंट्री!

## आजच्या सामन्यात बंगळुरूला देणार का आव्हान?

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

८ मार्च २०२३... ही ती तारीख आहे जेव्हा पाकिस्तानमध्ये धावांचा भूकंप झाला होता. जेव्हा इंग्लंडच्या सलामीवीराने पाकिस्तान सुपर लीगच्या सामन्यात कहर केला होता. आम्ही बोलत आहोत जेसन रॉयबद्दल, ज्याने पीएसएलच्या ८व्या हंगामात केवळ ४४ चेंडूत शतक झळकावून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. आता हाच जेसन रॉय आयपीएल २०२३ मध्ये खेळताना दिसणार आहे. कोलकाता नाईट रायडर्सने जेसन रॉयला आपल्या संघात सामील केले आहे.

आयपीएल २०२३ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सला शाकिब अल हसनच्या रूपाने मोठा धक्का बसला. आंतरराष्ट्रीय कर्तव्य आणि वैयक्तिक कारणांमुळे शाकिब आयपीएलच्या १६व्या हंगामात केकेआरचा भाग होऊ शकला नाही. आता कोलकाताने इंग्लंडचा वेगवान फलंदाज जेसन रॉयला आयपीएलसाठी संघाचा भाग बनवले आहे. रॉय हा त्याच्या आक्रमक फलंदाजासाठी ओळखला जातो. त्याच्या टी२० कारकिर्दीत त्याने आतापर्यंत एकूण ६ शतके झळकावली आहेत.

शाकिब अल हसनला डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या मिनी लिलावात केकेआरने १.५ कोटींची किंमत देऊन संघाचा भाग बनवले होते, परंतु काही कारणांमुळे तो यावर्षी स्पर्धेचा भाग होऊ शकला नाही. आता त्याच्या जागी जेसन रॉय केकेआर संघाचा भाग बनला आहे. रॉय क्वेटा ग्लॅडिएटर्सकडून खेळत होता आणि सलामीवीराने ६३ चेंडूत १४५ धावा केल्या. रॉयचा स्ट्राईक रेट २३० पेक्षा जास्त होता आणि त्याच्या बॅटमधून ५ षटकार आणि २० चौकार आले. त्याच्या झंझावाती खेळीच्या जोरावर क्वेटा संघाने १० चेंडू आधीच २४१ धावांचे लक्ष्य गाठले होते.

### रॉय पाच वर्षात फक्त तीन आयपीएल हंगाम खेळला

**जेसन रॉयने गेल्या वर्षी आयपीएलमधून आपले नाव काढून घेतले होते. या खेळाडूला गुजरात टायटन्सने २ कोटी रुपयांना खरेदी केले. हा खेळाडू २०१७ मध्ये पहिल्यांदा आयपीएल खेळला होता आणि आतापर्यंत या स्पर्धेत रॉयने १३ सामन्यात २९.९० च्या सरासरीने ३२९ धावा केल्या आहेत. रॉय यांचा स्ट्राइक रेट १२९ पेक्षा जास्त आहे.**



# ईडन गार्डनमध्ये आलं शार्दुल ठाकूरचं वादळ

। बुलढाणा। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



इंडियन प्रीमियर लीगच्या १६ व्या हंगामाता एकापेक्षा एक रंगतदार सामने होत असून या लीगचा ९ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात सुरु आहे. इडन गार्डनमध्ये कोलकाता-बंगळुरुची लढत सुरु असून आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या कोलकाता नाईट रायडर्सची खराब सुरुवात झाली. पॉवर प्ले मध्येच कोलकाताच्या संघाचे दोन फलंदाज गार झाले. डेविड विलीने एकाच षटकात दोन फलंदांजांच्या दांड्या गुल केल्या. विलिने व्यंकटेश अय्यर आणि मनदीप सिंगला स्वस्तात माघारी पाठवले. त्यानंतर केकेआरचा सलामीवीर फलंदाज रहमनुल्लाह गुरबाजने धडाकेबाज फलंदाजी करत दमदार अर्धशतक ठोकलं. गोलंदाजांचा धुव्वा उडवत २९ चेंडूत ६८ धावांची धडाकेबाज खेळी करत आयपीएलमधील पहिलं अर्धशतक ठोकलं. त्यामुळे कोलकाताने २० षटकांत ७ बाद २०४ धावा केल्या. त्यामुळे आरसीबीला विजयासाठी २०५ धावांची मजल मरावी लागणार आहे.आरसीबीने गोलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या केकेआरची पॉवर प्ले मध्ये खराब सुरुवात झाली. डेविड विलीने भेदक मारा करत केकेआरच्या दोन फलंदाजांचा त्रिफळा उडवला. विलीने अय्यरला अवघ्या तीन धावांवर बाद केलं, तर मनदीप सिंगला भोपळाही फोडू दिला नाही. त्यानंतर आरसीबीचा गोलंदाज ब्रेसवेलने कर्णधार नितीश राणाला एका धावेवर असताना बाद केलं.